| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०३.०२.२०२२ |
| नोंदणी दिनांक | : | ०४.०२.२०२२ |
| निकाल दिनांक | : | १८.०७.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | ०४ ०५ १५ |

सं.फौ.ख.क्र. २००/२०२२ नि.क्र. ५

नमुना क्र. ३२
भाग 'अ'
न्यायनिर्णयाचे शिर्षक पान
[फौजदारी प्रक्रिया संहितेचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(१)]

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.३), हिंगणघाट**
**यांच्या न्यायालयात**
(पिठासीन अधिकारीः– सि. ए. गवई)

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १८/०७/२०२६ |
| संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक | २००/२०२२ |
| प्रथम खबर अहवाल/अपराध क्र. | २९२/२०२१ |
| पोलीस स्टेशन | वडनेर, जि. वर्धा |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस स्टेशन वडनेर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा |
| प्रतिनिधित्व कर्ता | विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. वाय. शेंडे |
| आरोपी | **सुनिता दिलीप मोहाड**<br>वय – ४० वर्षे, धंदा – ढाबा चालक<br>रा. कुटकी, ता. हिंगणघाट, जि. वर्धा. |
| प्रतिनिधीत्व कर्ता | विद्वान वकील श्री मसाळकर |

**भाग 'ब'**

**[फौजदारी प्रक्रिया संहितेचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(२)]**

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | १४.१०.२०२१ |
| प्रथम खबर अहवाल चा दिनांक | १४.१०.२०२१ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २६.०१.२०२२ |
| दोषारोप तयार केल्याची तारीख | २९.०१.२०२५ |
| पुरावा आरंभचा दिनांक | १५.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव चा दिनांक | १८.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १८.०७.२०२६ |
| शिक्षेचा हुकुमचा दिनांक, जर असल्यास | -- |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर मुक्त केल्याचा दिनांक | अपराधाचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा लादली | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४२८ अन्वये संपरीक्षे दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **सुनिता दिलीप मोहाड** | ११.११.२०२१ | ११.११.२०२१ | कलम ६५(ई), ७७(अ) व ८३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | निर्दोष | | |

## – न्या य नि र्ण य –

## (आज दिनांक १८ जुलै, २०२६ रोजी पारित)

आरोपीविरुध्द कलम ६५(ई), ७७(अ) व ८३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अंतर्गत प्रस्तुत मामला चालविण्यात आला आहे.

२. प्रस्तुत खटल्याच्या निर्णयाकरीता खालीत मुद्दे माझ्या समोर उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी सकारण खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १४.१०.२०२१ रोजी संध्या. १५.०० ते १५.३० वाजताच्या दरम्यान मौजा कुटकी, हिंगणघाट येथे आरोपीच्या ताब्यातून देशी दारुच्या १८० एम. एल. च्या ८ शिश्या अवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आल्या व त्यानुसार त्यांनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई), ७७(अ) व ८३ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त केले. |

## कारणमिमांसा

३. आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ यांची साक्ष नोंदविली. पुरेशी संधी देवूनही इतर साक्षीदारांना उपस्थित ठेवण्यात अभियोग पक्षाला यश आले नाही. म्हणून अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र. १ वरील आदेशानुसार बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द कोणतेही गुन्हयात गुंतवणारा पुरावा मिळून न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे जबानी नोंदविण्यात आली नाही. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ करीता** –

४. आरोपी वरील दोषारोप सिध्द करतांना अभियोग पक्षाला प्रामुख्याने हे सिध्द करावे लागेल की, आरोपी हे देशी दारु अवैद्यरीत्या बाळगतांना मिळून आले. ही बाब सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पंच साक्षीदार यांचा तोंडी पुरावा तसेच

रासायनिक विश्लेषकाचा अहवाल यांची मदत घ्यावी लागेल.

५. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या साक्ष पुराव्यात कथन केले की ते आरोपीस ओळखतात. दि. १४.१०.२०२१ रोजी पोलीसांनी त्यांना पंच म्हणून हजर राहण्यासाठी सुचनापत्र दिले नव्हते. ते पोलीसांसोबत कुठेही गेले नाही. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. त्यांनी सुचनापत्र व जप्ती पंचनाम्यावर फक्त त्याची सही ओळखली. मजकुर अमान्य केला. अभियोग पक्षाने साक्षीदारास न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासात विचारणारी प्रश्ने विचारली. साक्षीदाराने त्या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली.

६. प्रस्तुत प्रकरणी साक्षीदार क्र. १ मोका जप्ती पंचनाम्यातील मजकूर अमान्य केला. अभियोग पक्षाने इतर पंच व साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषकाचा अहवाल अभिलेखावर दाखल केला असला तरी सी. ए. अहवालसाठीचे जप्त मुद्देमाल घेवून जाणा–यास अभियोग पक्षाने तपासले नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल रासायनिक विश्लेषणासाठी जमा झाला व त्याच्या आधारावर सी. ए. अहवाल तयार करण्यात आला. या बाबीस कुठेही पुष्टी मिळत नाही. तसेच आरोपीकडून जप्ती पंचनामा सिध्द न झाल्यामुळे विश्लेषणाला कसलाही अर्थ राहत नाही. त्यामुळे, प्रस्तुत साक्षीदाराच्या पुराव्यावरुन अभियोग पक्षाला मदत होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही, म्हणून मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>** –

७. थोडक्यात, आरोपीविरुध्द सबळ व रास्त संशयापलीकडे ठोस असा गुन्हादर्शक पुरावा असल्याशिवाय आरोपीविरुध्द लावण्यात आलेले आरोप शाबीत झाले असे म्हणता येणार नाही. सदर प्रकरणात जप्त मुद्देमाल देशी दारुच्या १८० एम. एल. च्या ८ शिश्या अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्याकडे विल्हेवाट लावण्याकरीता पाठविणे न्यायोचित होईल. उपरोक्त कारणांचा विचार करता, मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष लक्षात घेता मुद्दा क्र. २ च्या निष्कर्षात मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **सुनिता दिलीप मोहाड** यांना महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई), ७७(अ) व ८३ च्या दंडनिय अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये दोषमुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | जप्त मुद्देमाल देशी दारुच्या १८० एम. एल. च्या ८ शिश्या अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्याकडे विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात यावी. |
| ४. | आरोपी हे अपील दाखल झाल्यास अपील न्यायालयासमोर हजर राहतील. याकरीता त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे अपील कालावधीपर्यंत रु. १५०००/– किंमतीचा वैयक्तीक जाचमुचलका सादर करावा. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.) |

CHANDRASHEKHAR ASHOKRAO GAWAI
Digitally signed by CHANDRASHEKHAR ASHOKRAO GAWAI
Date: 2026.07.18 16:16:42 +0530

(सि. ए. गवई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
दि. १८.०७.२०२६ (न्यायालय क्र.३), हिंगणघाट

**भाग 'क'**

**[फौजदारी प्रक्रिया संहितेचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(३)]**

**अभियोग पक्ष/बचाव/न्यायालयाचा साक्षीदार यांची यादी**

**अ) अभियोग**

| अनु. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | उमेश देवरावजी पचारे | पंच |

**ब) बचाव साक्षीदार, जर असल्यास**

| अनु. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| ब.सा.क्र. | निरंक | निरंक |

**क) न्यायालयाचा साक्षीदार, जर असल्यास**

| अनु. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| न्या.सा.क्र. | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी**

**अ) अभियोगपक्ष**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**ब) बचाव**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## क) न्यायालयाचे निशाणी क्रमांक

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## ड) भौतिक वस्तु

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

CHANDRASHEKHAR ASHOKRAO GAWAI

Digitally signed by CHANDRASHEKHAR ASHOKRAO GAWAI
Date: 2026.07.18 16:16:51 +0530

(सि. ए. गवई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्यायालय क्र.३), हिंगणघाट

दि. १८.०७.२०२६

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

टायपीस्टचे नाव – अ. कृ. सरोदय (लघुलेखक श्रेणी–३)